आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२७ मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना केलं जाणारं व्यावसायिक एलपीजी वितरण ५० टक्क्यावरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- वित्त विधेयक २०२६ आणि विनियोजन विधेयक २०२६ क्रमांक २ ला संसदेची मंजुरी

- देशाची संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी २ लाख ३८ हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावांना संरक्षण खरेदी परिषदेची मंजुरी

- बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्रात जानेवारी २०११ पर्यंत झालेली सरकारी जमिनीवरची निवासी अतिक्रमणं नियमित करण्याचा शासन निर्णय जारी

आणि

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ६९० अंकांची घसरण

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचे दर आटोक्यात राखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात केली आहे. त्यामुळे पेट्रोलवरचं उत्पादन शुल्क प्रतिलीटर १३ रुपयावरुन ३ रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर १० रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकलं आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान डिझेलवरच्या आणि विमानाच्या इंधनावरच्या निर्यातशुल्कात वाढ केली आहे. डिझेलवर साडे एकवीस रुपये प्रतिलीटर, तर विमान इंधनावर साडे एकोणतीस रुपये प्रतिलीटर दरानं निर्यात शुल्क लागू राहील.

**<><><><><>**

राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यावरून ७० टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्राधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला

जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

वित्त विधेयक २०२६ आणि विनियोजन विधेयक २०२६ क्रमांक २ ला संसदेची मंजुरी मिळाली आहे. राज्यसभेनं चर्चेनंतर आज या विधेयकांना मंजुरी दिली. लोकसभेनं याआधीच ही दोन्ही विधेयकं मंजूर केली आहेत.

राज्यसभेत आज या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, अर्थव्यवस्था खुली केल्यामुळे प्रत्येक घटकाला लाभ मिळेल याची खबरदारी सरकारनं घेतली आहे….

**होल्ड - बाईट - निर्मला सीतारामन**

पश्चिम आशियातल्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या दरात झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर, वाढत्या इंधन खर्चापासून भारतीय ग्राहकांचं संरक्षण करण्यासाठी सरकारनं महत्त्वपूर्ण पावलं उचलली आहेत. त्यामुळे देशात डिझेल आणि पेट्रोलचे दर स्थिर आहेत, असं त्या म्हणाल्या.

**<><><><>**

देशाची संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालच्या संरक्षण खरेदी परिषदेने २ लाख ३८ हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. तसंच, संरक्षण खरेदी समितीने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ६ लाख ७३ हजार कोटी रुपयांच्या ५५ प्रस्तावांना मंजुरी दिली. चालू आर्थिक वर्षात दोन लाख २८ हजार कोटी रुपयांच्या ५०३ प्रस्तावांसाठी भांडवली खरेदी करारांवर स्वाक्षरी करण्यात आली आहे. यात हवाई सुरक्षेसाठी रिअल टाईम नियंत्रण मिळवणं, तोफखान्याची क्षमता वाढवणं, लांब पल्ल्यावर तसंच सर्व प्रकारच्या भू प्रदेशात अचूक आणि संहारक मारा करणं, रणगाड्यांना नष्ट करणारे शक्तिशाली दारुगोळे तयार करणं, मध्यम आकाराची विमानं, जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली अशा भारतीय लष्करासाठीच्या विविध यंत्रणांचा समावेश आहे. भारतीय तटरक्षक दलासाठी हेवी ड्युटी एअर कुशन वाहनांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

<><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधत आहेत.

<><><><>

राज्यात जानेवारी २०११ पर्यंत झालेली, आणि सध्या अस्तित्वात असलेली सरकारी जमिनीवरची निवासी अतिक्रमणं नियमित केली जाणार आहेत. यातून बृहन्मुंबईला वगळलं आहे.

राज्यातल्या गरीब आणि गरजू कुटुंबांना घरं देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सूचनेनंतर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. यासाठी पात्रता आणि अंमलबजावणीची कार्यपद्धती ठरली असून, ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याबाबत महसूल विभागानं शासन निर्णय जारी केला आहे.

<><><><>

सर्व क्षेत्रांमध्ये झालेल्या व्यापक विक्रीचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर सोळाशे नव्वद अंकांची घसरण झाली आणि तो ७३ हजार ५८३वर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४८७ अंकांची घट नोंदवत २२ हजार ८२० वर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंदणीकृत ३० पैकी २७ कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरात लॉकडाऊन घोषित केलं असल्याची बतावणी करणारा, समाज माध्यमांवर प्रसारित झालेला व्हीडिओ दिशाभूल करणारा असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे. हा व्हीडिओ धादांत खोटा असल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्य पडताळणी विभागानं स्पष्ट केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी किंवा केंद्र सरकारनं लॉकडाऊनबाबत अशी कोणतीही घोषणा केलेली नसून नागरिकांनी अशा कोणत्याही वृत्तावर विश्वास ठेवू नये, असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे.

<><><><>

भारताचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर पुढच्या आर्थिक वर्षासाठी ६ पूर्णांक १ दशांश टक्के इतका राहील असा अंदाज ओईसीडी अर्थात आर्थिक सहकार्य आणि

विकास संघटनेने वर्तवला आहे. २०२७-२८ या आर्थिक वर्षात हाच दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहणार असून त्यामुळे भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनेल, असा अंदाज ओईसीडीच्या हंगामी आर्थिक दृष्टीकोन अहवालात देण्यात आला आहे. जागतिक जीडीपी वाढ २०२६ मध्ये २ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवर स्थिर राहण्याचा अंदाज आहे. ही वाढ २०२७ मध्ये ३ टक्क्यांपर्यंत वाढेल, असा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

गेल्या दशकात युरियाचं देशांतर्गत उत्पादन २ कोटी ३० लाख मेट्रिक टनांवरून ३ कोटी १५ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढल्याची माहिती केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं ते म्हणाले. जागतिक पातळीवर जेनेरिक औषधांच्या पुरवठ्यापैकी भारताचा वाटा ३० टक्के असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत दिली.

<><><><><>

भोंदू अशोक खरात प्रकरणात अतिशय सखोल चौकशी सुरू असून आर्थिक फसवणुकीचे प्रकारही उघड झाले आहेत. लवकरच तसे गुन्हे नोंदवले जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांना सांगितलं. या प्रकरणातल्या पीडित महिलांच्या गोपनीयतेचं संरक्षण केलं जात असल्यानं अन्य पीडित महिलाही तक्रारींसाठी पुढे येत आहेत. मात्र, काही लोक गोपनीयतेचा भंग करण्याच्या प्रयत्नात असून त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

<><><><><>

बँकॉक इथं सुरु असलेल्या आशिया चषक जागतिक मानांकन तिरंदाजी स्पर्धेत चमकदार कामगिरी करत भारताच्या पुरुष तसंच महिला तिरंदाजांनी आज दोन सुवर्णपदकांसह ४ रौप्य आणि ४ कांस्य पदकांची कमाई केली. या १० पदकांमध्ये उदय कंबोजनं पुरुष कंपाउंड प्रकारात पटकावलेल्या सुवर्णपदकासह रजत चौहान आणि चिकिथा तनीपार्थी यांच्या मिश्र संघानं पटकावलेल्या एका सुवर्ण पदकाचा समावेश आहे.

//<><><><><>//